# प्रेमचंद यांच्या अनमोल कथा


**मुन्शी प्रेमचंद**

अनुवाद

**उज्ज्वला केळकर**



**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**प्रेमचंद यांच्या अनमोल कथा :** मुन्शी प्रेमचंद
अनुवाद : उज्ज्वला केळकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
उज्ज्वला केळकर
१७६१२, 'गायत्री', प्लॉट नं. - १२,
वसंतदादा साखर कामगार भवनजवळ, सांगली. ४१६४१६
फोन नं. ०२३३ - २३१००२०  मो. न. : ९४०३३१०१७०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

# कथासम्राट प्रेमचंद

मुन्शी प्रेमचंद हे २० व्या शतकातले हिंदीतील एक श्रेष्ठ साहित्यकार. 'उपन्याससम्राट' म्हणून त्यांना हिंदी आणि उर्दू भाषेतही गौरवलं जातं. ते जसे 'उपन्याससम्राट' आहेत, तसेच 'कहानीसम्राट'ही आहेत. हिंदी साहित्याच्या विकासाचा मागोवा घेताना, प्रेमचंद यांचं नाव घेतल्याशिवाय पुढे जाताच येणार नाही. त्यांनी हिंदी कथा आणि कादंबरीत एक अशी परंपरा विकसित केली की, या परंपरेने पुढे शतकभर नव्याने लिहू लागलेल्या साहित्यिकांना मार्गदर्शन केले. त्यांच्यानंतर आलेल्या साहित्यिकांच्या पिढीवर त्यांच्या साहित्याने विलक्षण प्रभाव टाकला होता. त्यांचं साहित्य हा हिंदी साहित्याचा अनमोल ठेवा आहे.

प्रेमचंदांचा जन्म १८८० मध्ये बनारसजवळील 'लमही' या छोट्या गावात झाला. त्यांचे खरे नाव धनपत राय श्रीवास्तव असे होते. त्यांना नबाब राय नावानेही ओळखत. त्यांचं बंरचसं जीवन अभावातच गेलं. त्या काळच्या परंपरेनुसार त्यांचा पहिला विवाह ते १५ वर्षांचे असताना झाला. तो यशस्वी झाला नाही. आर्य समाजाच्या विचारसरणीने ते प्रभावित झाले होते. आर्य समाज हे त्या काळातील एक मोठं धार्मिक आणि सामाजिक आंदोलन होतं. विधवा विवाहाचं त्यांनी समर्थन केलं आणि आपल्या प्रगतिशील विचारांना अनुसरून त्यांनी १९०६ साली दुसरा विवाह बालविधवा शिवरानी देवी यांच्याशी केला. १९१९ मध्ये बी.ए. झाल्यानंतर त्यांनी शिक्षण विभागात इन्स्पेक्टरची नोकरी केली. काही काळ त्यांनी अध्यापनाचंही काम केलं.

त्यांचा पहिला कथासंग्रह 'सोजे-वतन' (राष्ट्राचा विलाप) १९०८ साली प्रकाशित झाला. हा संग्रह उर्दूत लिहिलेला असून, नबाब राय नावाने तो प्रसिद्ध झाला. हमीरपूरच्या जिल्हा कलेक्टरांनी त्यांच्यावर जनतेला भडकवण्याचा आरोप करून या पुस्तकाच्या प्रती जप्त केल्या. त्यानंतर त्यांचे जिवलग मित्र 'जमाना'चे

संपादक, दयानारायण निगम यांनी त्यांना 'प्रेमचंद' या नावाने लिहिण्याचा सल्ला दिला व त्यानंतरचं त्यांचं सारं लेखन 'प्रेमचंद' या नावाने प्रसिद्ध झालं.

आपल्या साहित्यिक जीवनाचा प्रारंभ त्यांनी 'मर्यादा' पत्रिकेच्या संपादनाने केला. नंतर 'माधुरी'चं संपादन केलं. पुढे काशीत स्वत:चा प्रेस टाकून 'हंस' आणि 'जागरण' ही नियतकालिकं सुरू केली. काही काळ ती तोट्यात चालवली. कर्जबाजारी झाल्यानंतर ते मुंबईला चित्रपटकथा लिहिण्यासाठी आले; पण इथली हवा त्यांना मानवली नाही, म्हणून ते पुन्हा आपल्या गावी लमहीला परतले. दीर्घ आजारानंतर १९३६ साली त्यांचं निधन झालं.

प्रेमचंद यांनी हिंदी आणि उर्दू, दोन्ही भाषांतून लेखन केलं. त्यांची प्रतिभा बहुमुखी होती. कादंबरी, कथा, नाटक, समीक्षा, लेख, संपादकीय, संस्मरण असं अनेक प्रकारचं लेखन त्यांनी केलं. त्यांनी १५ कादंबऱ्या, ३०० पेक्षा जास्त कथा, ३ नाटकं, ७ बालपुस्तके, १० अनुवादित पुस्तके इतकं लेखन केलं. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांनी त्यांना विशेष यश आणि प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांनी सुरुवातीच्या काळात कथा-कादंबऱ्या प्रथम उर्दूत लिहिल्या. नंतर त्याचा अनुवाद हिंदीत केला. मात्र, त्यांच्या कादंबऱ्या प्रथम हिंदीत प्रसिद्ध झाल्या आणि नंतर उर्दूत.

त्यांच्या गोदान, गबन, कायाकल्प, प्रतिज्ञा, रंगभूमी, निर्मला, कर्मभूमी इ. अनेक कादंबऱ्या गाजल्या. लोकप्रिय झाल्या. त्यातही १९३६ साली लिहिलेली 'गोदान' ही त्यांची कादंबरी सर्वश्रेष्ठ मानली जाते. केवळ हिंदी साहित्यातच नव्हे, तर विश्व साहित्यात तिला गौरवाचं स्थान मिळालंय. तिचा अन्य भारतीय भाषांबरोबरच इंग्रजी, चिनी, जपानी, रशियन भाषेतही अनुवाद झाला आहे व त्या त्या भाषेतील वाचकांनाही या कादंबरीने प्रभावित केलंय. यामुळे प्रेमचंद हे केवळ हिंदी भाषेतील किंवा केवळ भारतीय साहित्यिक न राहता, वैश्विक साहित्यकारांमध्ये त्यांची गणना केली जाते.

प्रेमचंदांच्या जशा कादंबऱ्या गाजल्या तशाच कथाही. त्यांनी आपल्या कथांमधून सामाजिक आणि कौटुंबिक समस्यांकडे लक्ष केंद्रित केलं. सामाजिक कुरीती, धार्मिक अवडंबर, पाखंड, गरिबी, शोषण या सगळ्या गोष्टींनी एकीकडे त्यांना सुधारणावादी बनवलं, तर दुसरीकडे यथार्थवादी.

'शतरंज के खिलाडी', 'कफन', 'मंत्र', 'दो बैलों की कथा', 'डामुल का कैदी', 'नमक का दारोगा', 'सती', 'रानी सारंधा', 'पूस की रात', 'पंच परमेश्वर', 'मुक्तिमार्ग' अशा त्यांच्या अनेक कथा गाजल्या. त्यांच्या बहुतेक कथा कृषिजीवनाशी निगडित आहेत. शेतकऱ्यांची सुख-दु:खे, आशा-आकांक्षा, आशा-निराशा, राग-लोभ, उत्थान-पतन यांचं वास्तव चित्रण त्यांच्या कथेतून येतं. सुरुवातीच्या काळातील त्यांच्या कथा आदर्शवादाकडे झुकणाऱ्या होत्या. पुढच्या काळात त्या अधिकाधिक यथार्थवादी होऊ लागल्या. 'मुक्तिमार्ग', 'शतरंज के खिलाडी', 'कफन' या कथा त्याची उत्तम उदाहरणे आहेत.

प्रेमचंदांपूर्वी हिंदीमध्ये पौराणिक, धार्मिक, आध्यात्मिक, काल्पनिक किंवा मग रहस्यमय, वा वैषयिक साहित्य लिहिलं जायचं. प्रेमचंदांनी हिंदी साहित्यात यथार्थवादी परंपरा सुरू केली. पुढच्या काळात, 'दलित साहित्य', 'स्त्रीवादी साहित्य' असे प्रवाह निर्माण झाले. त्याबद्दल चर्चा होऊ लागल्या. या साहित्याची मुळं प्रेमचंदांच्या साहित्यात खोलवर रुजलेली दिसतात.

**– उज्ज्वला केळकर**

✦✦✦

# कथानुक्रम


| | | |
|---|---|---|
| १) | ईद | ९ |
| २) | मंत्र | २३ |
| ३) | चमत्कार | ३८ |
| ४) | हिरा-मोती | ५३ |
| ५) | जन्मठेपेचा कैदी | ६६ |
| ६) | सती | ९० |
| ७) | राणी सारंधा | १०२ |
| ८) | सज्जनतेचा दंड | ११९ |
| ९) | पंच परमेश्वर | १२७ |
| १०) | मुक्तिमार्ग | १३९ |
| ११) | सुजाण भगत | १५१ |
| १२) | पौषातील रात्र | १६३ |
| १३) | मिठाचा रक्षणकर्ता | १६९ |
| १४) | रंगेल रसिकलाल | १७८ |
| १५) | महातीर्थ | १८६ |
| १६) | बुद्धिबळाचे खेळाडू | १९८ |
| १७) | कफन | २०९ |


✦✦✦

# ईद

रमजानच्या तीस दिवसांच्या रोजांच्या (उपवासाच्या) नंतर ईद आलीय. किती मनोहर, आनंददायी पहाट आहे! वृक्षांवर अजब हिरवेपण आहे. शेतात खास अशी चमक आहे. आभाळात वेगळाच लालिमा आलाय. आजचा सूर्य पाहा, किती हवाहवासा, किती शीतल... जसं काही सगळ्या जगाला ईदच्या शुभेच्छा देतोय. गावात किती गडबड आणि किती उत्साह आहे! इदगाहला जाण्याची तयारी होते आहे. कुणाच्या कुडत्याला बटण नाही. शेजारच्या घरातून आणण्यासाठी पळतोय. कुणाचे बूट कडक झालेत. त्याला तेल घालण्यासाठी तेल्याच्या घरी धावतोय. भराभरा बैलांना वैरण-पाणी द्यायचं चाललंय. इदगाहहून परतताना दुपार होईल. तीन कोसांचा रस्ता. पायी जायचं. तिथे शेकडो लोक भेटणार. यायला दुपार होणारच. मुलं अगदी खूश आहेत. कुणी एका दिवसाचा रोजा ठेवलाय. तोही दुपारपर्यंत. कुणी कुणी तेवढाही नाही; पण इदगाहला जायची खुशी त्यांनाही आहेच. रोजे मोठ्यांसाठी- म्हाताऱ्यांसाठी असतील. मुलांसाठी मात्र ईद आहे. रोज ईदच्या नावाचा जप होतोय. ती आज आलीय. आता त्यांना घाई झालीय. ही मोठी माणसं लवकर लवकर का आवरत नाहीत?

संसारातील चिंता, अडचणी यांच्याशी मुलांचा काय संबंध? शेवयांसाठी दूध, साखर आहे की नाही तो मोठ्यांचा प्रश्न. मुलं शेवया खाणार. त्यांना काय माहीत अब्बाजान व्याकूळ होऊन चौधरी कयाम अलींच्या घरी पळत पळत का जाताहेत? त्यांना काय माहीत, की त्यांनी स्नेह कमी केला, तर ईद मोहरममध्ये बदलून जाईल. त्यांच्या खिशात कुबेराचं धन भरलंय. पुन्हा पुन्हा खिशातून आपला खजिना काढून ते मोजताहेत आणि खूश होऊन पुन्हा ठेवताहेत. महमूद मोजतोय, एक...दोन...दहा...बारा... त्याच्याजवळ बारा पैसे आहेत. मोहसीनजवळ, एक.... दोन... तीन... आठ.... नऊ...पंधरा पैसे आहेत. या अगणित पैशांतून अगणित गोष्टी ते घेणार आहेत. खेळणी, मिठाई, शिट्टी, चेंडू...आणखी न जाणे काय काय घेणार आहेत. सगळ्यात जास्त प्रसन्न आहे तो हमीद. तो चार-पाच

वर्षांचा आहे. अशक्त आणि दुबळा. त्याचा बाप गेल्या वर्षी पटकीने गेला आणि आई कुणास ठाऊक कशाने पिवळी पडत पडत एक दिवस मरून गेली. काय आजार झाला कुणाला कळलंच नाही. सांगितलं असतं, तरी ऐकणार कोण होतं? जे अंगावर पडेल ते मुकाट्याने झेलत होती बिचारी! आता हमीद आपली म्हातारी आजी अमीनाच्या कुशीत झोपतो आणि अगदी प्रसन्न आहे. कारण त्याचे अब्बाजान पैसे कमवायला गेले आहेत आणि खूपशा थैल्या घेऊन येणार आहेत. अम्माजान अल्लाह मियाँच्या घरून त्याच्यासाठी चांगल्या चांगल्या गोष्टी आणायला गेलीय, त्यामुळे हमीद अगदी प्रसन्न आहे.

आशा ही एक मोठी गोष्ट आहे. मुलांच्या आशेबद्दल काय बोलावं? त्यांची कल्पना तर राईचा पर्वत बनवते. हमीदचे बूट फाटले आहेत. डोक्यावर एक जुनीपानी टोपी आहे. त्याचा गोंडाही काळा पडलाय; पण तो प्रसन्न आहे. जेव्हा त्याचे अब्बाजान पैशांच्या थैल्या घेऊन येतील आणि अम्मीजान दुर्लभ वस्तू घेऊन येईल, तेव्हा त्याची स्वप्नं पूर्ण होतील. तेव्हा तो बघेल की, महमूद, मोहसीन, नूरे आणि सम्मी कुठून एवढे पैसे आणतील.

अभागिनी अमीना आपल्या घरात बसून रडते आहे. आज ईद आहे; पण तिच्या घरात दाणाही नाही. आज आबीद असता, तर काय अशा तऱ्हेने ईद आली असती आणि निघून गेली असती? या निराशेच्या अंधकारात ती बुडत चालली होती. कुणी बोलावलं होतं या निर्लज्ज, बेशरम ईदला! या घरात तिचं काही काम नाही; पण हमीद! त्याचा कुणाच्या जगण्या-मरण्याशी काय संबंध? त्याच्या आत प्रकाश आहे, बाहेर आशा. विपत्ती आपलं सारं सैन्य-बळ एकवटून येऊ दे. हमीदच्या अंतरात असलेला उत्साह, आनंद तिचा विध्वंस करून टाकेल.

हमीद आत जाऊन दादीला सांगतो, ''तू मुळीच घाबरू नकोस अम्मा, मी सगळ्यात आधी जाईन. अजिबात घाबरू नकोस.''

अमीनाच्या मनाला टोचणी लागली होती. गावातील सगळी मुलं आपापल्या बापाबरोबर चाललीत. हमीदला अमीनाशिवाय कोण आहे? त्याला एकट्याला जत्रेत कसं जाऊ द्यायचं? त्या गर्दीत मुलगा कुठे हरवला बिरवला तर? नाही. अमीना त्याला एकट्याला नाही जाऊ देणार! तीन कोस कसा चालेल? पायाला भेगा पडतील. बूटसुद्धा नाहीत. ती गेली असती म्हणजे अधूनमधून त्याला कडेवर घेतलं असतं; पण इथे शेवया कोण शिजवणार? पैसे असते म्हणजे येताना